## वैदिक वाङमय

आर्य सप्तसिंधू प्रदेशात स्थायिक झाले. निसर्गरम्य वातावरण, जीवनोपयोगी वस्तूंची रेलचेल यामुळे ते येथे रमले. या मातीशी एकरूप झाले. त्यांच्या चित्तवृत्ती उचबळून आल्या त्यांची प्रतिभा ओसंडून वाहू लागली. नवीन व प्रगत संस्कृतीचे बीजारोपण झाले. त्यातून इवलासा कोंब बाहेर आला. त्या कोंबाचे रोपटे व त्या रोपट्याचा महावृक्ष झाला. या महावृक्षाला रसाळ व मधुर फळे लागली. ही फळे म्हणजेच प्राचीन श्रेष्ठतम भारतीय वाङमय होय. हे वैदिक वाङमय म्हणजे वैदिक संस्कृतीचा गाभा होय.

**अ) वैदिक वाङमय**

वेद हा शब्द विद् धातुपासून बनला आहे. विद् म्हणजे ज्ञान, पवित्र ज्ञान, वालाच श्रुती असेही म्हणतात. प्राचीन काळी लेखनकलेचा उदय झाला नसल्याने हे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कंठस्थ पद्धतीने जात असे. कालांतराने त्याचे संकलन करण्यात येऊन ते ग्रंथबद्ध करण्यात आले. वैदिक वाङमय पुढीलप्रमाणे आहे.

१) वेद (संहिता) २) ब्राह्मणे ३) आरण्यके आणि ४) उपनिषदे,

**१) वेद (संहिता)**

**१) ऋग्वेद**

वेद चार आहेत. त्यापैकी सर्वात प्राचीन व महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ऋग्वेद. ऋक् म्हणजे ऋचा, श्लोक, स्तुतीमंत्र, ऋक + वेद =ऋग्वेद. हा ग्रंथ पद्यात्मक असून त्यात ऋग्वेदकालीन निरनिराळ्या देवतांचे स्तुतीमंत्र आहेत. यात देवतांच्या स्तुतीमंत्रां शिवाय इतरही ऋचा, सूक्ते आहेत. परंतु देवतांच्या ऋचांना प्राधान्य आहे. वेदातील मंत्रांना संहिता म्हणतात. ऋग्वेदाची १० मंडले (भाग) असून त्यात १०२८ सूक्ते व १०५५२ ऋचा आहेत. निरनिराळ्या ऋषीमुनींनी प्रदीर्घ कालखंडात ही सूक्ते रचली. या ग्रंथाच्या रचियेत्यांमध्ये भारद्वाज, विश्वामित्र, वशिष्ठ, अत्री इ. ऋषी महत्त्वाचे आहेत.

ऋग्वेदातील १० वे मंडल सर्वात मोठे व प्राचीन आहे. या ग्रंथात निरनिराळ्या देवतांना स्तुतीमत्रांद्वारे आवाहन करण्यात आले आहे. यातील काव्य मनाला भुरळ पाडणारे असून सूक्तांची रचना साधी वाटत असली तरी त्यातील आशय गहन आहे. या ग्रंथाचे मूळ रूप धार्मिक असल्याने त्याचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु धार्मिक माहितीबरोबरच आर्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी इतरही बरीच माहिती या ग्रंथात असल्याने त्याचे ऐतिहासिक मोलही लक्षणीय आहे. समृद्धी, शत्रूवर विजय इ. हेतूंसाठी प्रार्थनेद्वारे आवाहन करण्यात आले आहे. यातून ...या ग्रंथात सूर्य, अग्नी, वरुण, इंद्र इ. निसर्गदेवतांना चांगली संतती, दीर्घायुष्य, आर्यांचा भाषाविलास, कल्पनाविलास, सृष्टीसौंदर्य व तत्कालीन जीवनपद्धती यांची कल्पना येते. या ग्रंथाची रचना इ.स.पू. २५०० ते इ.स.पू. १५०० या काळात झाला असावी

**२) यजुर्वेद** –

यजुः + वेद = यजुर्वेद, यज्ञ म्हणजे पूजा, यज्ञ. ज्या संगी पूजा केली जाते किंवा यज्ञाच्या वेळी म्हणावयाचे मंत्र म्हणजे यजुः, यज्ञ किंवा पूजेच्या वेळी म्हणावयाच्या मंत्रांचा संग्रह ज्या ग्रंथात केला आहे तो ग्रंथ म्हणजे यजुर्वेद ऋग्वेदातील प्रार्थनासूक्ते कोणत्या प्रसंगी व कशी म्हणावी ते या ग्रंथात सांगितले आहे. काटेकोरपणे व विधिपूर्वक यज्ञ केल्यास निश्चित फळ मिळते ही यजुर्वेदाच शिकवण आहे. यात कर्मकांडावर भर देण्यात आला असून साध्यापेक्षा साधनांना जास्त महत्त्व देण्यात आले आहे. यजुर्वेदाचे १) शुक्ल आणि २) कृष्ण असे दोन भाग आहेत. शुक्ल यजुर्वेद - यजुर्वेदाच्या एकूण पाच संहिता आहेत. त्यापैकी वाजसनेयी ही शुक्ल यजुर्वेदाची संहिता आहे. याचे चाळीस अध्याय असून त्यात निरनिराळे मंत्र, उपासना तथा अनुष्ठाने सांगितली आहेत. कृष्ण यजुर्वेद याच्या काठ, काठक, तैत्तरिय आणि मैत्रायणी या चार संहिता असून यात यज्ञाचे सविस्तर वर्णन आहे. यज्ञाद्वारे निसर्गशक्तींना प्रसन्न करून इप्सित साधता येते यावर कृष्ण यजुर्वेदाचा भर आहे. या ग्रंथाची रचना कुरुक्षेत्रावर झाली.

**३) सामवेद** –

साम म्हणजे गीत. यात यज्ञाच्या वेळी म्हणावयाच्या ऋचांचा संग्रह आहे. विशिष्ट मंत्र विशिष्ट वेळी तालासुरात म्हटल्यानेच फलप्राप्ती होते. तेव्हा कोणते मंत्र कसे म्हणावे ते यात सांगितले आहे. सामवेदाचे दोन भाग असून आर्चिक ज्यात ५८५ रागांचा व उत्तरार्चिक ज्यात ४०० गाण्यांचा संग्रह आहे. सामवेदातील मंत्रांची संख्या एकूण १८१० आहे ज्यात काही मंत्रांची पुनरुक्ती आहे. ती टाळली तर १५४९ मंत्र उरतात त्यापैकी १४७५ मंत्र ऋग्वेदातील आहेत. म्हणजे सामवेदातील मूळ मंत्रांची संख्या ७४ आहे. सामवेद हा भारतीय शास्त्रीय संगीताचा मूलाधार यात यज्ञकर्माविषयी माहिती आहे. आहे.

**४) अथर्ववेद –**

याचे मूळ नाव अथर्वांगिरस आहे. सुरुवातीला या ग्रंथाचा समावेश वेदात करण्यात आला नव्हता. या ग्रंथातील मंत्रांचे दोन भाग आहेत. १) अथर्वण मंत्र हे कल्याणकारी तर २) अंगीरस मंत्र हे अपायकारक आहेत. अथर्ववेदात ऋग्वेदातील देवतांना गौण स्थान देऊन भूत, पिशाच्च, राक्षस इ. अघोरी देवतांना महत्त्व देण्यात आले आहे. या अघोरी शक्तींना प्रसन्न करून शत्रूला त्रास देण्यासाठी या मंत्रांचा वापर केला जात असे. तंत्र, जारण-मारण, जादूटोणा इ. कल्पनांचे मूळ अथर्ववेदात सापडते. ऋग्वेदातील निसर्गपूजा मागे पडून आर्य अघोरी शक्तींच्या मागे लागलेले दिसतात. याच्या शौनक आणि पिप्पलाद या दोन शाखा आहेत. यात राजाची निवड कशी करावी, राज्याभिषेकाच्या वेळी कोणते मंत्र म्हणावेत तसेच ' शत्रूवर विजय मिळविण्यासाठी कोणत्या मंत्रांचे उच्चारण करावे ते सांगितले आहे. 'वैदिक वाङ्मयाचे चार मुख्य भाग आहेत.

**२) ब्राह्मणे**

ब्राह्मणे ब्रह्म शब्दापासून ब्राह्मण या शब्दाची उत्पत्ती झाली आहे. ब्रह्म - म्हणजे उच्चकोटीचे ज्ञान, पवित्र ज्ञान वेदकाळात यज्ञादि धार्मिक कार्य ब्राह्मण (पुरोहित) वर्गाकडे होते. वेदातील अनेक ऋचांचा अर्थ काही काळानंतर लोकांना कळेनासा झाला. पुरोहितांनी हा अर्थ स्पष्ट करून सांगितला. हा अर्थ ज्या ग्रंथांत स्पष्ट करून सांगितला आहे त्यांना ब्राह्मणे म्हणतात. याचे स्वरूप आध्यात्मिक असून प्रत्येक वेदाची वेगवेगळी ब्राह्मणे आहेत.ऋग्वेदाचे ऐतरेय व शांखायन, सामवेदाचे तांड्य, षडविश आणि जैमिनीय; - - कृष्ण यजुर्वेदाचे - तैत्तरिय; शुक्ल यजुर्वेदाचेशातपथ आणि अथर्ववेदाचे गोपथ हे ब्राह्मण ग्रंथ आहेत.

**३) आरण्यके –**

ब्राह्मण ग्रंथांचा उत्तर भाग म्हणजे आरण्यके. आर्यांच्या जीवनात यज्ञ व यज्ञविधीला अत्यंत महत्त्व होते. वानप्रस्थाश्रम काळात ऋषी-मुनी जेव्हा अरण्यात वास्तव्य करण्यास जात तेव्हा त्यांना अरण्यात यज्ञ व यज्ञविधींचे काटेकोरपणे पालन करणे शक्य नसे. त्यामुळे ते आपला जास्तीत जास्त वेळ ध्यान-धारणा, मनन-चिंतन यात घालवित. त्यांच्या चिंतनाचे विषय असत सृष्टी, तिचा विकास, लय, मृत्यू इ. याच चिंतनातून अरण्यात जे साहित्य निर्माण झाले त्याला आरण्यके म्हणतात.

**४) उपनिषदे**

उपनिषदे हे ब्राह्मण ग्रंथाचे उत्तर भाग असल्याने त्यांना 'वेदांत' - असेही म्हटले जाते. उपनिषद् = उपनिषद उप म्हणजे जवळ, न म्हणजे खाली आणि षद् म्हणजे बसणे शिष्य विनम्र होऊन गुरुजवळ जातो तेव्हा गुरुने शिष्याला एकांतात जे गूढ ज्ञान दिले त्याला उपनिषद म्हणतात. उपनिषदांचा निश्चित आकडा माहीत नाही. त्याची संख्या १०८ मानली जाते. ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैत्तिरिय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक ही १० उपनिषदे महत्त्वाची मानली जातात. वेदांत किंवा उपनिषदांना वेदांचे सार मानले जाते. उपनिषदात आत्मज्ञानाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. विश्व व जीव यांचे अंतिम स्वरूप काय, मोक्षप्राप्तीचा मार्ग कोणता इ. गहन विषयांची यात चर्चा करण्यात आली आहे. उपनिषदांना भारतीय तत्त्वज्ञानाचा पाया मानले जाते. यातून आर्यांची वर्णव्यवस्था, त्यांचे राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवन इ. ची माहिती मिळते.

**वेदांगे –**

नव्या काळाचा नवा मनु हवा. नव्या रोगावर नवीन औषध हवे. वेदातील विचार, प्रश्न त्यावरील उत्तरे त्या काळाला धरून होती. आर्यांचा जसजसा विकास होत गेला तसतसे नवे विचार, नवे प्रश्न निर्माण होऊ लागले. त्यांची उत्तरे वेदात सापडणे कठीण होते. त्यासाठी त्या प्रश्नांचा नवीन संदर्भात विचार करून उत्तरे नव्याने शोधणे आवश्यक होते. या आवश्यकतेतूनच वेदांगाची रचना वेदांगे म्हणजे वेदातील प्रश्नांना नवीन संदर्भात उत्तरे देण्याचा केलेला प्रयत्न ही उत्तरे सूत्रबद्ध पद्धतीने देण्यात आली. त्यामुळे वेदांगांना 'सूत्रवाङ्मय' असेही ही वेदांना पूरक असल्यामुळे त्यांना वेदांगे म्हणतात. हे सर्व ज्ञान श्रवणपद्धतीने चाल असल्यामुळे त्यांना 'स्मृति' ग्रंथही म्हणतात. वेदांगे सहा आहेत. १) शिक्षा २) कल्प ३) व्याकरण ४) निरुक्त ५).आणि ६) ज्योतिष,

**१) शिक्षा**

पूर्वी लेखनकला अवगत नव्हती. सर्वज्ञान मुखोद्गत करावे लागे हे पाठांतर चुकीच्या पद्धतीने झाल्यास चुकीचे ज्ञान पुढील पिढीकडे जाणार. हे नये म्हणून शुद्ध उच्चार कसे करावे, कोणत्या शब्दावर आघात द्यावे इ. ची माहित शिक्षा वेदांगात देण्यात आली आहे.

**२) कल्पसूत्र –**

याचे चार भाग आहेत.

**अ) श्रोतसूत्रे** - यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या यज्ञाचे नियम सांगण्यात आले आहेत.

**ब) गृह्यसूत्रे -** यात गृहस्थाने घरात लहान प्रमाणात करावयाच्या यज्ञाचे नियम सांगण्यात आले आहेत.

**क) धर्मसूत्रे -** वैयक्तिक व सामाजिक जीवनात पाळावयाच्या नीतिनियमाची यात चर्चा करण्यात आली आहे.

**ड) शूल्वसूत्र** यज्ञकुंड कसे व कुठे बांधावे, यज्ञवेदीची रचना कशी असावी,त्याचे मोजमाप किती असावे याची माहिती यात आहे. हे सूत्र म्हणजे भारतीय भूमितीशास्राव पाया आहे. पायथागोरसचा सुप्रसिद्ध सिद्धांत याच सूत्रावर आधारित आहे.

**३) निरुक्त** –

शब्दांची उत्पत्ती कशी झाली, शब्दांचे धातू, त्यांचे अर्थ याविषयीची चर्चा यात आहे.

**४) व्याकरण** –

प्रत्येक भाषेची अंगीभूत शिस्त असते. त्यामुळे भाषेची शुद्धता टिकून राहते. भाषेची शिस्त म्हणजे तिची बांधणी, रचना इ. यालाच व्याकरण म्हणतात. यात संस्कृत भाषेच्या व्याकरणाची चर्चा आहे.

**५) छंदशास्त्र** –

वैदिक मंत्र तालासुरावर म्हटले तरच इच्छित फलप्राप्ती होते. कोणत्या मनोकामनेसाठी कोणते मंत्र कोणत्या तालासुरांवर म्हणावे ते यात सांगितले आहे.

**६) ज्योतिषशास्त्र** –

शुभकार्य यशस्वी व्हावे यासाठी त्याचा प्रारंभ केस करावा, त्यावेळी आकाशस्थ ग्रह-नक्षत्रांची स्थिती कशी असावी याविषयी या ग्रंथात विचार मांडण्यात आले आहेत. याचे ऋग्वेद ज्योतिष, यजुर्वेद ज्योतिष आणि अथर्ववेद ज्योतिष असे तीन भाग आहेत. महिने व वर्ष, चंद्र-सूर्य यांची गती याचीही यात चर्चा करण्यात आली आहे.

**षडदर्शन -**

ही दर्शने सहा आहेत.१) न्यायदर्शन २) वैशोषिक दर्शन ३) सांख्यदर्शन ४) योगदर्शन ५) पूर्वमीमांसा आणि ६) उत्तरमीमांसा.आर्यांच्या धार्मिक व सांस्कृतिक विकासाबरोबरच त्यांच्या विचारातही बदल होऊ लागला. आतापर्यंत यज्ञ व तपसाधनेद्वारेच मोक्षप्राप्ती होते अशी त्यांची समजूत होती परंतु आता सत्याच्या दर्शनाने म्हणजेच पवित्र ज्ञानाच्या प्राप्तीने मोक्ष मिळतो अशी त्यांची धारणा बनली. याच धारणेतून षडदर्शनांची निर्मिती झाली.

**१) न्यायदर्शन** -

याचा रचियेता गौतम ऋषी असून ज्ञानाचा आधार व ते मिळविण्याच्या मार्गाची यात चर्चा करण्यात आली आहे.

**२) वैशोषिक दर्शन** –

याची रचना कणाद ऋषींनी केली असून त्यात पदार्थ (वस्तू) म्हणजे काय, त्याचे भौतिक स्वरूप व गुणधर्मांची चर्चा करण्यात आली आहे.

**३) सांख्यदर्शन** –

कपिलमुनी याचा रचियेता असून याचे प्रमुख सिद्धांत पुढीलप्रमाणे आहेतं. अ) पुरुष (व्यवहारात ज्याला आपण आत्मा म्हणतो) व प्रकृती (आपले शरीर धरून सर्व सृष्टी) ही दोन तत्त्वे मूलतः भिन्न आहेत. ब) सृष्टीमधील नानाविध घडामोडींचे एकमेव कारण प्रकृती आहे. क) पुरुष चेतन, निर्गुण व निष्क्रिय असून अनेक आहेत. ड) पुरुषाने प्रकृतीपासून स्वतःच्या वेगळेपणाचा बोध करून घेणे म्हणजेच कैवल्य अथवा मोक्ष होय.

**४) योगदर्शन** –

योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध मन अतिशय चंचल असून ते सतत भरकटत असते. मन हे इंद्रियासक्त असल्याने ते भरकटत असते. योगाद्वारे इंद्रियासक्त मनाला मुक्त करून त्याला ईश्वचरणी केंद्रित करण्यावर भर देण्यात आला आहे. या ग्रंथाचा कर्ता पतंजली आहे.

**५) पूर्वमीमांसादर्शन** –

वेदात यज्ञाची महती सांगण्यातच आली आहे. यज्ञ करणे म्हणजेच मोक्ष मिळविणे असा समज दृढ झाला होता. कालांतराने याविरुद्ध प्रतिक्रया निर्माण होऊ लागल्या तेव्हा यज्ञाला पुनर्प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी जैमिनी ऋषींनी या ग्रंथाची रचना केली. यात यज्ञविधी व कर्मकांडावर भर देण्यात आला आहे. तसेच व्यावहारिक धर्मावरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

**६) उत्तरमीमांसादर्शन** - बादरायण ऋषींनी हा ग्रंथ लिहिला. ब्रह्म म्हणजे काय? ब्रह्म व इतर चराचर, सजीव-निर्जीव यांचा संबंध, ब्रह्मपदप्राप्तीचा मार्ग इ. विषयांची यात चर्चा करण्यात आली आहे.

**स्मृतिवाङ्मय**

आर्यांचा सर्वांगीण विकास होऊ लागला. नवनवीन भूप्रदेश ते व्यापू लागले. आतापर्यंत कटाक्षाने टाळलेला वर्णसंकर अनार्यांशी वारंवार येणाऱ्या संपर्कामुळे अपरिहार्य ठरला. यातून अनेक सामाजिक व धार्मिक प्रश्न निर्माण झाले. या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न स्मृतिग्रंथात करण्यात आला आहे. यात मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृता, नारद स्मृती, विष्णु स्मृती हे स्मृतिग्रंथ मुख्य होत.

**१) मनुस्मृती किंवा मानव धर्मशास्त्र**

सर्व स्मृतिग्रंथांत मनुस्मृती हा सर्वात प्राचीन व महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथाचा काळ इ.स.पू. दुसरे शतक असावा. इ.स. दुसऱ्या शतकात मनुस्मृतीच्या अनेक आवृत्त्या तयार झाल्या. या ग्रंथात काही नवीन सांगण्याचा अट्टाहास नाही. तर निरनिराळ्या ग्रंथांत सांगितलेले नीतिनियम संकलित करून ते कायद्याच्या रूपात मांडण्याचा प्रयत्न या ग्रंथात करण्यात आला आहे. हा ग्रंथ भृगु ऋषींनी लिहिला. ते मनुवंशाचे असल्याने या ग्रंथाला मनुस्मृती म्हणतात. बौद्ध व जैन धर्माच्या उदयामुळे वैदिक धर्माला आलेली मरगळ टाकून वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी हा ग्रंथ लिहिला गेला. यात १२ अध्याय आणि २६९४ श्लोक असून हिंदू कायद्यावरचा प्राचीन काळातील हा सर्वोत्कृष्ट ग्रंथ होय. यात दिवाणी व फौजदारी कायदा, खरेदी-विक्री, दान, करार, जमिनीसंबंधीचे कायदे, चोरी, मारामारी, घरफोडी, व्यभिचार इ बरोबरच वर्णाश्रम व्यवस्था, स्त्रीस्वातंत्र्य, राजा व प्रजा यांच्यातील संबंध, विधवांची कर्तव्ये यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. आजची भारतीय कायदेपद्धती बव्हंशी याच ग्रंथावर आधारली आहे. ९ व्या शतकात मेघातिथीने आणि ११ व्या शतकात गोविंदराजाने मनुस्मृतीवर टीका लिहिली. यातून मनुस्मृतितील अनेक कठीण भागांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**२) याज्ञवल्क्य स्मृती**

याज्ञवल्क्य ऋषींनी लिहिलेल्या या ग्रंथात निवळ कायद्याचाच विचार करण्यात आला आहे. स्त्रीधन, विधवेचा वारसाहक्क, विवाहासंबंधी नियम इ.ची चर्चा यात आहे. याज्ञवल्क्यांनी साक्षीपुरावा म्हणून लिखित कागदपत्रांचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. हा ग्रंथ इ.स.च्या तिसऱ्या शतकात रचला गेला.

**३) नारदस्मृती –**

यात विधवेच्या पुनर्विवाहाचा विचार मांडण्यात आला आहे ,परंतु तिचा पतीच्या संपत्तीवरील हक्क अमान्य करण्यात आला आहे. यात काही व्यावसायिक संघ व त्यांच्या नियमांची चर्चा आहे.

**४) विष्णुस्मृती –**

यात सामाजिक समस्यांचा विचार करण्यात आला असून सतीप्रथेचीही चर्चा करण्यात आली आहे. हे सर्व स्मृतिग्रंथ आर्यांच्या धर्मशास्त्राचे आधारभूत ग्रंथ आहेत. आज देशात कायद्याची शास्त्रशुद्ध सहिता आहे. त्यामुळे आज स्मृतिग्रंथ कालबाह्य झाले आहेत परंतु त्यांचे ऐतिहासिक महत्त्व त्रिकालाबाधित आहे.

**भगवद्गीता –**

महाभारताला हिंदू धर्माचा ज्ञानकोष मानतात. त्या महाभारताचा एक भाग म्हणजे गीता होय. महाभारत युद्धाच्या वेळी कुरूक्षेत्राच्या रणभूमीवर कौरव व पांडवांचे अठरा अक्षौहिणी सैन्य समोरासमोर उभे ठाकले असताना ज्याच्या पराक्रमाच्या भरवशावर पांडवांनी युद्धाचा सारीपाट मांडला तो अर्जुन अचानक गलितगात्र किंकर्तव्यमू झाला, युद्धविन्मुख होण्याची भाषा बोलू लागला. कर्तव्यावर भावनेने मात केली, अर्जुनादी ही संभ्रमावस्था पाहून त्याचे सारथ्य करणाऱ्या श्रीकृष्णाने अर्जुनाला कार्यप्रवण करण्यासाठी जो उपदेश केला तो उपदेश म्हणजे गीता विषण्ण झालेल्या अर्जुनाला गीतेच्या रूपाने जीवनयुद्धाचे तत्त्वज्ञान सांगणारा कृष्ण व अर्जुन यांच्यातील हा संवाद म्हणजे सर्व उपनिषदांचे सार होय. सर्व उपनिषदे या गायी आहेत आणि गीतारूपी अमृत त्यापासून निघालेले दूध होय असे गीतेविषयी म्हटले जाते.

अर्जुनाला युद्धप्रवण करण्यासाठी श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश म्ह गीता, म्हणून ती कर्मप्रवण आहे. त्यात उपनिषदांचे तत्त्वज्ञान असल्याने ती ज्ञानयोग आहे. श्रीकृष्ण हा गुरू व अर्जुन हा त्याचा साधक किंवा शिष्य यांच्यातील ही च असल्याने ती भक्तीयोगही आहे.

गीतेचे सार थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. कुरूक्षेत्राच्या रणमैदानावर ऐन युद्धाच्या वेळी आप्तेष्टांचा वध करावा लागणार म्हणून अर्जुनापुढे संभ्रम निर्माण झाला असताना श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतो की कोणी खऱ्या अर्थाने मरत नाही किंवा मारत नाही. शरीर नाशवंत असल्याने ते कधी ना कधी नष्ट होणारच परंतु आत्मा अमर आहे. तसेच युद्धातील हत्या करताना कोणतीही आकांक्षा ठेवली नाही तर ते पाप न ठरता कर्तव्य ठरते. कर्तव्याच्या भूमिकेवर कर्म आले की त्यात पाप-पुण्याची भावनाच येत नाही. कर्म करताना फलाची अपेक्षा बाळगली नाही तर ते कर्म पाप न ठरता योग ठरते. फलाची अपेक्षाच ठेवली नाही तर विषादही उरत नाही. विजयाची आशा किंवा

पराभवाची भीती न बाळगता माणसाने आपले कर्म करावे. फलाची अपेक्षा न ठेवल्यास नैराश्य येत नाही. मन नेहमी उत्साही व कार्यप्रवण राहते. गीता म्हणते की मानवी जीवनाची इतिकर्तव्यता फक्त तप आणि त्यागातच नाही, त्यासाठी स्वधर्म पालनही आवश्यक आहे. "स्वधर्मे निधनम् श्रेयः " हे गीतेतील वचन सुप्रसिद्धच आहे. मोक्ष किवा मुक्ती केवळ आदर्श आचरणामुळे मिळत नाही तर भक्तीमुळे मिळते आणि भक्तीमार्ग हा स्त्री-पुरुष, जातीभेदविरहित आहे. जीवनात कोणतीही आसक्ती न ठेवता सर्व काही ईश्वराधीन समजून कर्म करणे यालाच निष्काम कर्मयोग म्हणतात. ‘‘कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन" हा गीतेचा सिद्धांत आहे. गीतेत मांडलेले विचार सार्वकालिक आणि चिरंतन आहेत म्हणूनच ती एक अमर कलाकृती आहे.

**पुराणे**

पुराणाची रचना महाकाव्यानंतर झाली कारण पुराणात महाभारतातील - अनेक कथा आहेत. बहुतेक पुराणाची सुरुवात दंतकथांनी होते. त्यात अतिशयोक्त वर्णने जागोजागी आहेत त्यामुळे त्यांचे ऐतिहासिक मोल कमी होते परंतु त्यांचे सांस्कृतिक मूल्य अनन्यसाधारण आहे. पुराणांमुळेच भारतीय संस्कृतीचा प्रसार भारतभर झाला.पुराणात सृष्टीचा उदय-विकास, देव-दानव संघर्ष, निरनिराळ्या राजांच्या वंशावळ्या, त्यांचे पराक्रम. राज्याभिषेक, समाजाचे नीतिनियम इ.ची चर्चा आहे. पुराणे एकूण १८ असून तितकीच उपपुराणे आहेत. १) विष्णू २) नारद ३) गरूड ४) वराह ५) पद्म ६) भागवत ७) ८) ब्रह्मांड ९) ब्रह्मवैवर्त १०) मार्कडेय ११) भविष्य १२) मत्स्य १३) वासत १४) बाबू १५) स्कंध १६) कूर्म १७) लिंग आणि १८) अग्नी. यापैकी विष्णू, मत्स्य आणि ब्रह्मांड ही पुराणे ऐतिहासिक महत्त्वाची